MHST070018592026

**म.सं.कौ.हि.का. अर्ज नं. ४३/२०२६ मधील निशाणी ५ खालील आदेश**

**(XXX वि. XXX)**

**(आदेश दि. १०/०८/२०२६)**

१. अर्जदार हिने मुळ अर्ज महिलांचे कौटुंबिक संरक्षण कायदा कलम १२ नुसार विविध मागण्यांसाठी दाखल केलेला आहे. हा अंतरिम अर्ज गैरअर्जदार यांनी अर्जदार हिच्यावर कोणत्याही प्रकारचा कौटूंबिक हिंसाचार करु नये असा मनाई आदेश पारित करावा, अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये २०,०००/- अंतरीम पोटगी तसेच नुकसान भरपाई म्हणून रक्कम रुपये ५,००,०००/- मंजूर करावे या मागणीकरिता दाखल केलेला आहे.

२. गैरअर्जदार क्र. १ याला नोटीस बजावणी होवून देखील तो गैरहजर राहिला. त्यामुळे निशाणी १ वरील आदेशानुसार प्रकरण गैरअर्जदार क्र. १ यांचे विरोधात एकतर्फा चालविण्यात आले.

३. अर्जदार हिच्या कथनांवरुन माझ्या मते खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होत आहेत. सदरील प्रत्येक मुद्दयांचा निष्कर्ष मी कारणांसहीत अनुमान काढुन खालीलप्रमाणे नोंदवलेला आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने हे शाबीत केले आहे काय की, ती व्यथीत व्यक्ती आहे व गैरअर्जदार यांनी तिच्यावर कौटूंबिक हिंसाचार केलेला आहे? | होय. |

| | | |
|---|---|---|
| २. | अर्जदार हिने हे शाबीत केले आहे काय की, तिला संरक्षणाच्या आदेशाची गरज आहे? | होय. |
| ३. | अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याकडून पोटगी रक्कम मिळणेस पात्र आहे काय? असल्यास किती ? | अंशतः होय. |
| ४. | अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याकडून नुकसान भरपाई रक्कम मिळणेस पात्र आहे काय? | नाही. |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

४. अर्जातील मागणी सिद्ध करण्यासाठी अर्जदारतर्फे काही कागदपत्र दाखल करण्यात आले. अभिलेखावरील कागदपत्रांचा ऊहापोह योग्य त्या ठिकाणी करण्यात येईल. अर्जदार हिने तिचे उत्पन्न व खर्चाचे शपथपत्र (निशाणी ७) वर दाखल केलेले आहे.

५. अर्जदारातर्फे वकील श्री.एस.एस.राऊत यांचा युक्तिवाद ऐकला.

६. अभिलेखाचे अवलोकन केले.

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ व २ करिता –**

७. मुद्दे क्र. १ व २ हे एकमेकांशी संलग्न असलेने पुराव्याची पुनरावृत्ती टाळणेसाठी माझे विचारात एकत्र घेतलेले आहे.

८. अर्जदाराच्या कथनानुसार अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार याची पत्नी असून गैरअर्जदार यांनी तिच्यावर कौटूंबिक हिंसाचार केलेला असल्यामुळे ती गैरअर्जदार यांच्यापासून विभक्त राहत आहे. अर्जदाराने तिच्या विवाहाचा फोटो व विवाह

नोंदणीचे प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे, अर्जदार ही गैरअर्जदार याची पत्नी असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द् होते. सबब, अर्जदार ही गैरअर्जदार यांच्यासोबत कौटुंबिक नातेसंबंधामध्ये असल्याचे प्रथम दर्शनी सिध्द् होते.

९. अर्जदाराने तिच्या मुळ अर्जात व अंतरिम पोटगीच्या अर्जात गैरअर्जदार यांनी तिच्यावर केलेल्या शाररिक व मानसिक तसेच आर्थिक हिंसाचाराच्या घटना सविस्तरपणे शपथपत्रावर नमूद केलेल्या आहेत. प्रकरण गैरअर्जदार विरुध्द एकतर्फा असल्याने सदरील घटना नाकारण्यासाठी कोणतेही संयुक्तीक कारण नाही. त्यामुळे, उपलब्ध अभिलेखाचा प्रथमदर्शनी विचार करता अर्जदार ही व्यथित व्यक्ती आहे व गैरअर्जदार यांनी तिच्यावर कौटूंबिक हिंसाचार केलेला आहे ही बाब प्रथमदर्शनी सिध्द् होते. त्यामुळे, अर्जदार ही अंतरिम संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. १ व २ बाबत मी याप्रमाणे होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करिता</u> –**

१०. अर्जदारातर्फे युक्तीवाद करण्यात आला की, गैरअर्जदार हा अर्जदार हिचा पती आहे. तो शेती व चालक म्हणून काम करुन दरमहा रक्कम रुपये ४० ते ५० हजार कमवितो. गैरअर्जदार याच्याकडे उत्पन्नाचे साधन आहे. अर्जदार हिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. मुळ अर्ज निकाली लागण्यासाठी वेळ लागणार आहे. त्यामुळे, मागणीप्रमाणे अंतरिम पोटगी अर्ज मंजूर करावा.

११. अर्जदार ही गैरअर्जदार याची पत्नी असून तिच्यावर कौटूंबिक हिंसाचार झालेला असल्याचे प्रथम दर्शनी सिद्ध झालेले आहे. अर्जदार ही गैरअर्जदारापासून विभक्त राहत असल्याबाबत तिने शपथेवर कथन केलेले आहे. अर्जदार ही विभक्त राहत असल्यापासून गैरअर्जदार याने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची तरतुद केल्याबाबत अभिलेखावर प्रथमदर्शनी काहीही आलेले नाही. अर्जदार हिचा उदरनिर्वाह व सांभाळ करण्याची कायदेशीर तसेच नैतिक जबाबदारी गैरअर्जदार याचीच आहे. त्यामुळे, अर्जदार हिला गैरअर्जदार याच्याकडून अंतरीम पोटगी मंजुर करणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे.

१२. अर्जदार हिने तिला गैरअर्जदार यांच्याकडून अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रूपये २०,०००/– मंजूर करावेत अशी विनंती केलेली आहे. अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदार शेती व चालक म्हणून काम करुन दरमहा रक्कम रुपये ४० ते ५० हजार कमवितो. परंतू, गैरअर्जदार याच्या उत्पन्नाबाबत प्रथमदर्शनी अभिलेखावर कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नसल्याने गैरअर्जदार याचे मासिक सरासरी उत्पन्न रक्कम रुपये १६,०००/– ग्राहय धरुन अर्जदार यांची मागणी विचारात घेणे गरजेचे आहे.

१३. अर्जदार ही गैरअर्जदार याची पत्नी असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द् झालेले आहे. गैरअर्जदार याला शाररिक व्याधी असल्याबाबत प्रथमदर्शनी कोणताही पुरावा आलेला नाही. त्यामुळे, गैरअर्जदार याच्याकडे उत्पन्नाचे साधन आहे ही बाब नाकारण्यासाठी प्रथमदर्शनी कोणतेही संयूक्तिक कारण नाही. अशा परिस्थीतीत अर्जदार व गैरअर्जदार यांच्या रहाणीमानाचा तसेच अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाचा आणि सध्याच्या महागाईचा विचार करता गैरअर्जदार याच्याकडुन अर्जदार हिला अंतरीम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रुपये ५,०००/– मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. सबब, मुद्दा क्र. ३ बाबत मी याप्रमाणे अंशत: होकारार्थी निष्कर्ष नोंदवत आहे.

<u>**मुद्दा क्र. ४ करिता**</u> –

१४. अर्जदाराने तिला झालेल्या शाररिक व मानसिक कौटूंबिक हिंसाचारापोटी रक्कम रुपये ५,००,०००/– नुकसान भरपाई मंजूर करावी अशी विनंती केलेली आहे. परंतू, त्याबाबत पुराव्याअंती आदेश पारित करणे संयुक्तीक होणार आहे. त्यामुळे, अंतरिम पोटगी अर्जावेळी सदर मागणी मंजूर करता येणार नाही. सबब, मुद्दा क्र. ४ बाबत मी याप्रमाणे नकारार्थी निष्कर्ष नोंदवत आहे.

<u>**मुद्दा क्र. ५ करिता**</u> –

१५. एकंदरीत वर विवेचन केल्याप्रमाणे गैरअर्जदार याने अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध होते. मुळ अर्ज गुणवत्तेवर निकाली होण्यासाठी कालावधी लागणार आहे. त्यामुळे अर्जदाराला वरील प्रमाणे अंतरिम पोटगी

अर्जाच्या तारखेपासून मंजूर करणे गरजेचे आहे. सबब, मुद्दा क्र. ५ करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज (निशाणी ०५) अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार अक्षय रविंद्र सराटे याला असा आदेश देण्यात येतो की, त्याने अर्जदार हिला अंतरीम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रुपये ५,०००/– अंतरिम पोटगी म्हणून अंतरिम पोटगीच्या अर्जाच्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ०६/०५/२०२६ पासून ते मूळ अर्जावर निकाल लागेपर्यंत द्यावेत.

३. अर्जदाराची इतर अंतरिम मागणी नामंजूर करण्यात येते.

४. या आदेशाचे प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना मोफत द्यावी.

५. आदेश खुल्या न्यायालयात थेट संगणकावर टंकलिखीत करुन जाहीर केला.

PRASHANT PRAKASHRAO KULKARNI
Digitally signed by PRASHANT PRAKASHRAO KULKARNI
Date: 2026.08.10 15:55:34 +0530

दिनांक – १०/०८/२०२६.

**(प्रशांत पी. कुलकर्णी)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. ३, कराड.